आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२१ जून २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- योगाची उपयुक्तता जगभरातल्या लोकांना समजल्यामुळे योगाभ्यासाची व्याप्ती वाढली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात प्रतिपादन
- तूर, हरभरा आणि काबुली चणा यांच्या साठ्यावर सरकारचे निर्बंध
- जहाल नक्षलवादी संजय उर्फ बीच्छेम सुकलू पूनेमचं गोंदिया पोलिसांपुढं आत्मसमर्पण

  **आणि**

- १८व्या 'मिफ', चित्रपट महोत्सवाचा सांगता सोहळा मुंबईत सुरु, /'इंडिया इन अमृत काल' विभागात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार एडमंड रॅन्सन यांच्या 'लाइफ इन लूम' या लघुपटाला प्रदान

**<><><><><>**

गेल्या १० वर्षात योगाभ्यासाची व्याप्ती वाढली असून योग पर्यटनाविषयीचं आकर्षण वाढल्यामुळे लोक भारतात त्याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी येतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य समारंभ आज जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर इथं शेर ए काश्मीर आंतरराष्ट्रीय परिषद केंद्रात झाला. त्यावेळी ते बोलत होते.

शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक वाढीसाठी योगाच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. योगाची उपयुक्तता जगभरातल्या लोकांना समजल्यामुळे योगाभ्यास करणाऱ्यांची संख्या वाढली आहे असंही ते म्हणाले. तुर्कमेनिस्तान, सौदी अरेबिया अशा अनेक देशातल्या शैक्षणिक संस्थांमधे योगशास्त्राचा समावेश अभ्यासक्रमात केल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या योग हा संशोधनाचा विषय झाल्याचं त्यांनी

सांगितलं. यावेळी नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्रातही आज सर्वत्र योग दिन मोठ्या उत्साहात  साजरा झाला.

योगाच्या अमूर्त ठेव्याचं रक्षण करणं आणि त्याचा प्रचार - प्रसार करणं हे प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं. राजभवनमधे त्यांच्या उपस्थितीत योगसत्राचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय जीवन शैलीची आयुर्वेद आणि योग  ही दोन विशेष अंगं आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. गेट वे ऑफ इंडिया इथं आयोजित योग दिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उपस्थित होते. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी उत्तर मुंबईत चारकोप मार्केट इथं योगा ऑन स्ट्रीट आणि  इतर कार्यक्रमात सहभागी होत, योगासनं केली. मुंबईचे माजी नगरपाल नाना चुडासामा यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मरिन ड्राईव्ह इथं प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुलाखाली केलेल्या सुशोभीकरणाचं लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. या पुलाखाली विविध प्रकारच्या योगमुद्रा कलाकृती साकारल्या आहेत.

दक्षिण मध्य मुंबई वडाळा भारतीय जनता पार्टी विधानसभा यांच्यामार्फत आयोजित कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**<><><><><>**

सरकारनं तूर, हरभरा आणि काबुली चणा यांच्या साठ्यावर नियंत्रण घातलं आहे. ग्राहकांना रास्त भावात डाळी मिळाव्यात आणि साठेबाजी किंवा अन्य गैरप्रकार होऊ नयेत यासाठी शासनानं हे पाऊल उचललं आहे. घाऊक तसंच किरकोळ व्यापारी, डाळ मिलचे मालक, बहुशृखंला किरकोळ विक्रेते, आणि आयातदार या सगळ्यांनाच हा निर्णय लागू आहे. ही साठेमर्यादा ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत लागू राहणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि कृषी अर्थतज्ज्ञांशी अर्थसंकल्पपूर्व चर्चा केली. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या प्रतिनिधींशीही त्यांनी बैठक घेऊन चर्चा केली. अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी आणि संबंधित खात्यांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकांना उपस्थित होते.

वस्तू आणि सेवाकर परिषदेची ५३ वी बैठक उद्या सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत होणार आहे. नवं सरकार स्थापन झाल्यानंतर या परिषदेची ही पहिलीच बैठक होत आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून बांगला देशाच्या प्रधानमंत्री शेख हसीना आज भारतात आल्या आहेत. त्यांची ही भेट दोन दिवसांची आहे. देशात नवं सरकार स्थापन झाल्यापासून पहिल्यांदाच अन्य देशीय नेतृत्व भारतात आलं आहे. नरेंद्र मोदी आणि त्यांच्या मंत्रिमंडळाच्या शपथविधी सोहोळ्याला देखील शेख हसीना उपस्थित होत्या.

देशाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी आज संध्याकाळी शेख हसीना यांची भेट घेतली. भारत आणि बांगला देश या दोन्ही राष्ट्रांमधलं नातं

अतूट आहे, भविष्यात होणाऱ्या विशेष भागीदारीसाठी त्यांनी मोलाचं मार्गदर्शन केलं, असं जयशंकर म्हणाले. हसीना यांच्या या दौऱ्यात उद्या महत्वाचे करार होणार आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीनं विश्वासार्ह बातम्या देण्याची ओळख जपलेली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या रॉयटर्स इन्स्टिट्यूट फॉर स्टडी ऑफ जर्नालिझमच्या ताज्या वार्षिक सर्वेक्षणात आकाशवाणीच्या बातम्यांच्या विश्वासार्हतेच्या बाबतीत असलेल्या अग्रगण्य स्थानावर शिक्कामोर्तब केलं आहे. कोणत्याही परिस्थितीत वास्तव बातम्या देण्याच्या आकाशवाणीच्या अतूट वचनबद्धतेचं हे द्योतक आहे, असं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी याबद्दल प्रतिक्रिया देताना सांगितलं. सेहगल यांनी आकाशवाणीत झालेल्या योगदिन कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी आकाशवाणीच्या महासंचालक मौशुमी चक्रवर्ती याही उपस्थित होत्या.

**<><><><><>**

२ हजार १३ सालापासून माओवादी चळवळीत सक्रिय असलेल्या, सालेकसा तालुक्यातल्या पोलिसांच्या चकमकीत सहभाग असलेल्या जहाल नक्षलवाद्यानं, गोंदिया पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं आहे. संजय उर्फ बीच्छेम सुकलू पूनेम असं आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्याचं नाव असून तो मूळचा छत्तीसगढचा आहे. शासनानं त्याच्यावर ७ लाखाचं बक्षिस जाहीर केलं होतं. या माओवाद्यानं जिल्हाधिकारी प्रजित नायर, जिल्हा पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधिक्षक नित्यानंद झा यांच्या समक्ष, नक्षल आत्मसमर्पण योजनेअंतर्गत आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

१८व्या 'मिफ', अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा समारोपाचा सोहळा आज मुंबईत सुरु आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहेत. इतर क्षेत्रासह भारत चित्रपटांच्या क्षेत्रातही आघाडीवर आहे. भारतीय कलावंत त्यांच्या कामाद्वारे जगभरात पोहोचत असल्याचं प्रतिपादन मुनगंटीवार यांनी यावेळी केलं. त्यांच्या हस्ते उपस्थित कलाकारांचा सन्मान करण्यात आला. अभिनेते शेखर सुमन, अभिनेत्री छाया कदम, अभिनेता विशाल मल्होत्रा, दिग्दर्शक एमी बरुआ यांच्यासह इतर कलाकारांना शाल आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीच्या सुवर्णशंख पुरस्कारासह इतर पुरस्कारांचं वितरण या कार्यक्रमात होत आहे. यावेळी 'इंडिया इन अमृत काल' या विभागात सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पुरस्कार एडमंड रॅन्सन यांच्या 'लाइफ इन लूम' या लघुपटाला मुनगंटीवार यांनी प्रदान केला. पदार्पणातल्या सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा दादासाहेब फाळके चित्रनगरी पुरस्कार and towards happy alley या चित्रपटासाठी श्रीजॉय सिंग यांना चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे यांनी प्रदान केला. सर्वोत्कृष्ट छायाचित्रणाचा पुरस्कार 'गुंतता हृदय हे' यासाठी सूरज ठाकूर आणि ' धोटपाटण ' यासाठी बबिन दुलाल यांना संयुक्तरित्या देण्यात आला.

**<><><><><>**

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे ज्येष्ठ पत्रकार लता राजे यांना प्रतिष्ठेचा युगारंभ पुरस्कार आज प्रदान करण्यात आला. पत्रकार संघाच्या ८३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी रामदास फुटाणे उपस्थित होते.

ज्येष्ठ छायाचित्रकार संतोष बने, ज्येष्ठ पत्रकार विजय कुमार बांदल, पत्रकार पंकज दळवी आणि प्रमोद तेंडुलकर हे इतर पुरस्कारांचे मानकरी ठरले.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर एटमधील ग्रुप दोनमधे इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांचा सामना सुरु आहे. सेंट लुसियामधे डॅरेन सॅमी नॅशनल क्रिकेट मैदानात सुरु असलेल्या सामन्यात, इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

त्याआधी झालेल्या आजच्या पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं बांगलादेशचा २८ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

उत्तर महाराष्ट्रात नंदूरबार आणि धुळे जिल्ह्याचा काही भाग वगळता राज्यात सर्वत्र नैऋत्य मौसमी पावसाचं आगमन झालंय.

गेल्या चोवीस तासात कोकणात तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार, तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**